# 'नियमीत प्रसिध्दी पत्रक'
# पोलीस अधीक्षक कार्यालय, उस्मानाबाद.

**सोमवार, दि.१६/११/२०२०**
**वेळ: १९.००**

---

## "मोटार वाहन कायदा अंतर्गत १७२ कारवाया- ४०,००० ₹ 'तडजोड शुल्क प्राप्त."

उस्मानाबाद जिल्ह्यातील महत्वाच्या रस्त्यांवर दि. १५.११.२०२० रोजी १८ पोलीस ठाणी व उस्मानाबाद शहर वाहतुक शाखा यांनी मोटार वाहन कायदा अंतर्गत १७२ कारवाया करुन ४०,००० ₹ **'तडजोड शुल्क'** वसुल केले आहे.

## "जुगार विरोधी कारवाई."

**पोलीस ठाणे, बेंबळी:** आबा मनोहर आगळे, रा. मेडसिंगा, ता. उस्मानाबाद हा दि. १५.११.२०२० रोजी स्वत:च्या शेतात देशी दारुच्या १५ बाटल्या (किं.अं. ७८०/-रु.) विनापरवाना बाळगला असतांना पो.ठा. बेंबळी च्या पथकास आढळला. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद आरोपीविरुध्द म.दा.का. अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे.

## "फसवणूक."

**पोलीस ठाणे, लोहारा:** लोहारा तहसील कार्यालयाजवळील वैभवी झेरॉक्स सेंटरचे चालक- पुष्कराज राम चौधरी, रा. लोहारा हे दि. ०९.११.२०२० रोजी इंटरनेटवर सर्फींग करत होते. दरम्यान त्यांना www.bankmitraservice.co.in या वेबसाईटवर जाउन त्यांनी CSP (कस्टमर सर्विस पॉईंट) ही सेवा मिळण्यासाठी ऑनलाईन अर्ज केला. थोड्या वेळाने त्यांना एका अनोळखी मोबाईल क्रमांकावरुन कॉल करणाऱ्या व्यक्तीने, "मी बँक मित्र सर्विस कंपनीकडून बोलतोय तुम्हाला आमच्या कंपनीची सेवा पाहिजे असल्यास संगणक, सॉफ्टवेअर इत्यादीचे १५,८०० ₹ शुल्क भरावे लागेल." असे सांगुन व्हॉट्सअपद्वारे स्टेट बँक ऑफ इंडीयाचा एक खाते क्रमांक पाठवला असता त्या खात्यावर चौधरी यांनी रक्कम भरली. त्यानंतर त्या समोरील अनोळखी व्यक्तीने चौधरी यांना ३ वेगवेगळ्या फोन क्रमांकाद्वारे अनेकदा संपर्क साधुन अनामत रक्कम, तालूका स्तरीय एजन्सी चार्जेस इत्यादी भरावे लागतील असे बहाने सांगुन दिलेल्या खात्यात विविध रकमा भरण्यास सांगीतले. अशा प्रकारे चौधरी यांनी युपीआय ॲपद्वारे वेळोवेळी एकुण ७५,८०० रक्कम त्या खात्यात भरली. परंतु थोड्या दिवसांनी त्या समोरील व्यक्तीने पुन्हा कॉल करुन ४५,००० ₹ रक्कम मागीतली असता चौधरी यांना आपली फसवणूक झाल्याचा संशय आला. त्यांनतर चौधरी यांनी त्या क्रमांकावर संपर्क साधला असता समोरील व्यक्तीने त्यांना उडवाउडवीची उत्तरे दिली.

अशा मजकुराच्या पुष्कराज चौधरी यांनी आज दि. १६.११.२०२० रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ४२० आणि माहिती तंत्रज्ञान कायदा कलम- ६६ (सी), (डी)अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**पोलीस ठाणे, बेंबळी:** शकील उस्मान सय्यद, रा. धारुर, ता. उस्मानाबाद यांना दि. १५.०७.२०२० रोजी एका अज्ञात क्रमांकावरुन फोन कॉल आला होता. तो कॉल त्यांच्या पुतण्याने स्विकारला असता समोरील व्यक्तीने, “मी बँकेतून बोलतोय तुमचा एटीएम- डेबीट कार्ड क्रमांक व माहिती द्या.” असे सांगीतले. यावर त्यांच्या पुतण्याने समोरील व्यक्तीस चुलते- शकील सय्यद यांच्या एटीएम- डेबीट कार्ड क्रमांक व कार्डच्या पाठीमागील ३ अक्षरी सीव्हीव्ही क्रमांक त्या व्यक्तीस सांगीतले. थोड्यावेळाने त्यांना बँकेकडून ओटीपीचे संदेश आला असता त्यांच्या पुतण्याने त्या संदेशातील मजकूराची खात्री न करता ओटीपी क्रमांक त्या व्यक्तीस सांगीतला. यानंतर गेल्या ४ महिन्यांत त्या समोरील अज्ञात व्यक्तीने वेळोवेळी कॉल करुन, व्हॉट्सअप संदेश करुन आलेल्या संदेशांतील ओटीपी मागीतले असता शकील यांच्या पुतण्याने बँकेकडून आलेले ओटीपी संदेश समजावून न घेता ते ओटीपी क्रमांक समोरील व्यक्तीस वेळोवेळी सांगीतले. या प्रकारात शकील यांच्या खात्यातील एकुण ४६,८०० ₹ रक्कम अन्यत्र स्थलांतरीत झाली असल्याचे शकील सय्यद यांना दि. १४.११.२०२० रोजी समजले. अशा मजकुराच्या शकील सय्यद यांनी काल दि. १५.११.२०२० रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ४२० आणि माहिती तंत्रज्ञान कायदा कलम- ६६ (सी), (डी) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## “अपघात.”

**पोलीस ठाणे, मुरुम:** चालक- लिंबराज दत्तात्रय काशीमपुरे, रा. पुणे यांनी दि. १२.११.२०२० रोजी १४.१५ वा. सु. दाळींब येथील राष्ट्रीय महामार्ग क्र. ६५ वर कार क्र. एम.एच. १४ जीए ४५४६ ही निष्काळजीपणे चालवून रस्त्याच्या कडेला उभारलेल्या रियाजुद्दीन इमामुद्दिन सय्यद, वय ६४ वर्षे, रा. दाळींब, ता. उमरगा यांना जोराची धडक दिली. या अपघातात रियाजुद्दीन सय्यद हे गंभीर जखमी होउन मयत झाले. अपघातानंतर नमूद कारचालक घटनास्थळावरुन कारसह पसार झाला. अशा मजकुराच्या मुहीजअहमद रियाजुद्दीन सय्यद (मयताचा मुलगा) यांनी काल दि. १५.११.२०२० रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- २७९, ३३८, ३०४ (अ) आणि मो.वा.का. कलम- १८४, १३४ (अ) (ब) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**पोलीस ठाणे, शिराढोन:** हरीभाउ अर्जुन चौरे, वय ३५ वर्षे, रा. खामसवाडी, ता. कळंब हे दि. ०८.११.२०२० रोजी १९.०० वा. सु. गावातील साठे चौकातून पायी चालत जात होते. यावेळी ट्रॅक्टर क्र. एम.एच. २५ एएस १२३५ च्या अज्ञात चालकाने ट्रॅक्टर निष्काळजीपणे चालवून हरीभाऊ चौरे यांना पाठीमागून धडक दिली. या अपघातात हरीभाउ चौरे यांचा उजवा पाय मोडला आहे. अशा मजकुराच्या हरीभाउ चौरे यांनी काल दि. १५.११.२०२० रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- २७९, ३३७, ३३८ आणि मो.वा.का. कलम- १८४ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**पोलीस ठाणे, आंबी:** वाहन क्र. एम.एच. ४२ एच ९२५१ च्या अज्ञात चालकाने दि. १५.११.२०२० रोजी १७.०० वा. सु. मुगाव येथील आनाळा- परंडा रस्त्यावर नमूद वाहन निष्काळजीपणे चालवून रस्त्याने पायी जाणाऱ्या मंगल तात्या सुतार, वय ५० वर्षे, रा. टेंभुर्णी, ता. माढा यांना पाठीमागून धडक दिली. या अपघातात मंगल सुतार या गंभीर जखमी होउन मयत झाल्या. अपघातानंतर नमूद वाहनाचा अज्ञात चालक घटनास्थळावरुन वाहनासह पसार झाला. अशा मजकुराच्या पार्वती बाळु सुतार, रा. टेंभुर्णी यांनी आज दि.

१६.११.२०२० रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- २७९, ३०४ (अ) आणि मो.वा.का. कलम- १८४, १३४ (अ) (ब) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**"मारहाण."**

**पोलीस ठाणे, नळदुर्ग:** भगवान गेनदेव शिंदे, रा. येवती, ता. तुळजापूर हे दि. १५.११.२०२० रोजी ११.०० वा.सु. चिवरी शिवारातील शेतात होते. यावेळी भाऊबंद- सुदाम नागनाथ शिंदे यांनी शेतजमीनीत वाटा देत नसल्याच्या कारणावरुन भगवान शिंदे यांना शिवीगाळ करुन लाथाबुक्क्यांनी, दगडाने मारहाण करुन जखमी केले. तसेच तसा हिस्सा न दिल्यास भगवान शिंदे यांस कुटूंबासह ठार मारण्याची धमकी दिली. अशा मजकुराच्या भगवान शिंदे यांनी काल दि. १५.११.२०२० रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ३२४, ३२३, ५०४, ५०६ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**पोलीस ठाणे, उस्मानाबाद (ग्रा.):** शेतातील पाणी रस्त्यावर आल्याच्या कारणावरुन १)श्रीमंत बाबुराव कोल्हे २)भारत कोल्हे ३)ऋषी कोल्हे, सर्व रा. सारोळा, ता. उस्मानाबाद यांनी दि. १०.११.२०२० रोजी १७.०० वा. सु. सारोळा शेतशिवारात भाऊबंद- सुरेश त्रिंबक कोल्हे यांना शिवीगाळ करुन टिकाव, कुदळ, काठीने मारहाण करुन गंभीर जखमी केल्याने सुरेश कोल्हे यांचे दोन्ही हात मोडले. अशा मजकुराच्या सुरेश कोल्हे यांनी वैद्यकीय उपचारादरम्यान दिलेल्या लेखी निवेदनावरुन भा.दं.सं. कलम- ३२५, ३२४, ५०४, ५०६, ३४ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**पोलीस ठाणे, शिराढोन:** शेतजमीनीच्या भांडणाच्या कारणावरुन १)रामभाउ लकडे २)शांतलिंग लकडे ३)महादेव लकडे ४)गणेश लकडे ५)आकाश झोरी ६)सुरज झोरी ७)शुभम लकडे, सर्व रा. खामसवाडी, ता. कळंब यांनी बेकायदेशीर जमाव जमवून दि. १४.११.२०२० रोजी २३.३० वा. सु. गावकरी- परमेश्वर शिवाजी चांदणे यांना त्यांच्या राहत्या घरासमोर शिवीगाळ करुन लाथाबुक्क्यांनी, काठीने मारहाण करुन जखमी केले. अशा मजकुराच्या परमेश्वर चांदणे यांनी वैद्यकीय उपचारादरम्यान दिलेल्या लेखी निवेदनावरुन भा.दं.सं. कलम- ३२४, ३२३, ५०४, ५०६, १४३, १४७, १४९ अन्वये आज दि. १६.११.२०२० रोजी गुन्हा नोंदवला आहे.

---

**जनसंपर्क विभाग, उस्मानाबाद पोलीस.**